# पुणेरी पलटनचं टॉप २ मध्ये स्थान निश्चित! जयपूर पिंक पँथर्सवर मिळवला मोठा विजय

दिल्ली, १५ ऑक्टोबर २०२५: प्रो कबड्डी लीग २०२५ स्पर्धेतील ८६ वा सामना पुणेरी पलटन आणि जयपूर पिंक पँथर्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत पुणेरी पलटनचा दबदबा पाहायला मिळाला. शेवटी पुणेरी पलटनने हा सामना ५७- ३३ च्या फरकाने आपल्या नावावर केला. यासह टॉप २ मध्ये आपलं स्थान पक्क केलं आहे.

त्यागराज इनडोअर स्टेडियममध्ये पार पडलेल्या या सामन्यात पुणेरी पलटनकडून पंकज मोहितेने ९ आणि गौरव खत्रीने ७ गुणांची कमाई केली. तर जयपूर पिंक पँथर्सकडून अली समादीने सर्वाधिक १४ गुणांची कमाई केली.

या सामन्यात पुणेरी पलटनकडून पहिली चढाई करण्यासाठी अस्लम इनामदार चढाईला आला. त्याने पाहिल्याच चढाईत २ गुणांची कमाई करत दमदार सुरुवात केली. त्यानंतर पंकज मोहितेने २ गुणांची कमाई करत गुणसंख्येत आणखी भर घातली. अलीसमादीने बोनस घेत जयपूर पिंक पँथर्स संघाचं खातं उघडलं. पुणेरी पलटनने सुरुवातीच्या मिनिटांमध्येच जयपूर पिंक पँथर्सला दणका दिला. चौथ्या मिनिटाला पहिल्यांदा ऑलआऊट करत ९-२ गुणांसह ७ गुणांची आघाडी घेतली. सुरुवातीच्या १० मिनिटात पुणेरी पलटनचा बोलबाला पाहायला मिळाला. पुणेरी पलटनने १५-८ गुणांसह ७ गुणांची आघाडी घेतली.

पूर्वार्धातील १३ व्या मिनिटाला जयपूर पिंक पँथर्स संघाने दमदार पुनरागमन केलं. अलीसमादीने पुणेरी पलटनला ऑलआऊट करत १७-१३ गुणांसह पिछाडी भरून काढली. पण पंकज मोहितेने लागोपाठ गुण घेऊन पुणेरी पलटनला पुनरागमन करून दिलं. शेवटची ४ मिनिटे शिल्लक असताना पुणेरी पलटनकडे ६ गुणांची आघाडी होती. पूर्वार्धातील २० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ २३- १५ गुणांसह ८ गुणांनी आघाडीवर होता.

उत्तरार्धातील सुरुवातीच्या काही मिनिटांमध्ये जयपूर पिंक पँथर्सने दमदार पुनरागमन केलं. पण चौथ्या मिनिटाला पुणेरी पलटनने जयपूरला दुसऱ्यांदा ऑलआऊट केलं आणि २८-२० गुणांसह ८ गुणांनी आघाडी घेतली. उत्तरार्धातील सुरुवातीच्या १० मिनिटांचा खेळ झाल्यानंतर पुणेरी पलटनचा संघ ३८-२४ गुणांनी आघाडीवर होता.

सुरुवातीला आघाडी घेणाऱ्या पुणेरी पलटनने शेवटपर्यंत आपली आघाडी कायम ठेवली. शेवटी पुणेरी पलटनने हा सामना ५७- ३३ च्या फरकाने आपल्या नावावर केला.